# बदल तंत्रशिक्षणातील

**श्री सौमित्र घोटीकर हे पुर्वाश्रमीपासून मशिनरी व्यावसायिक आहेत व जोडीला २००९ पासून त्यांनी online मार्केटिंग कंपनीही स्थापिली आहे. सदर कंपनीमार्फत वेब साईट्स, सोशल मिडिया मार्केटिंग वगैरे विषयांवर सखोल मार्गदर्शन केले जाते.**

**मोबाईल: ९८५०९९७११० इमेल: contact@joywebservices.com वेबसाईट: www.joywebservices.com**

जेव्हा जेव्हा एखाद्या यशस्वी माणसाची (*तुमच्या आमच्यातल्या*) वाटचाल बघतो; उद्योजकतेविषयी जरा जास्तच ओढ, आस्था असल्यामुळे त्यातलीच उदाहरणे जास्त समोर येतात. नोकरी करणाऱ्या मंडळींबद्दल मला कोणताही आकस नाही, त्यांनी तो स्वीकारलेला एक मार्ग आहे. आताशा व्यवसायाच्या कक्षा जरा रुंदावत असल्या, तरीही नोकरी चा मार्ग स्वीकारणे म्हणजे बऱ्यापैकी “*डोकंच लावायला नको, तुमच्याच डोक्याप्रमाणे चालतो*”, महिन्याचे पैसे सिक्युअर, मग क्रमाक्रमाने जॉब सिक्युअर... म्हणजे अधिक सिक्युअर जॉब कडे वाटचाल, निवृत्तीनंतरचही प्लानिंग हा असाच विचाराचा मार्ग, प्रवाह आहे. आणि ह्या प्रकारे विचार करून अधिकाधिक “सोयी” करून ठेवणे, ह्याला समाजात प्रचंड मान आहे. हीच मंडळी मज्जा-बिज्जा करताना दाखवतात. पटत नसेल, तर सगळ्या जाहिराती बघा. ह्या, अशाच प्रकारे जगणाऱ्या मंडळींवर शूट केलेल्या असतात. त्यामुळे लोकांच्या मनावर “हे असंच life” वगैरे हवं असे परिणाम क्षणोक्षणी होत असतात. आणि मग अशा प्रकारे जगण्यासाठी तशा प्रकारचे जॉब्ज, त्या संधी देणारी शहरं, संस्था, Colleges ह्यांची कास धरली जाते.

## सर्व समस्या एकाच पद्धतीने सोडविण्याची माहिती देणे म्हणजे शिक्षण “देणे”

ह्या colleges मध्ये होलसेल मध्ये एकाच पद्धतीने सर्व समस्या सोडविण्याची तंत्र सांगितली जातात. “**डिजिटल मार्केटिंग**” ह्या नव्यानेच अस्तित्वात आलेल्या प्रकाराविषयी हेच म्हणता येईल. शब्दाबद्दल आक्षेप नाही, पण त्या अंतर्गत जे काही चाललेलं पाहतो, तेव्हा वाटतं ... “*ये तो होनाही था* !” मुळात **डिजिटल मार्केटिंग** म्हणजे एखाद्या व्यवसायाला online माध्यमातून (*म्हणजेच डिजिटल बरका* !) लोकांपर्यंत पोचविणे. Online माध्यमांचा प्रचंड विस्फोट झाल्याने प्रचंड संधी निर्माण झाल्या आहेत असं दिसतं, आणि ह्या क्षेत्रात प्रचंड “स्कोप” आहे असं अनेक मंडळींच्या लक्षात येवू लागतं. लगेच अभ्यासक्रम तयार केले जातात, प्रचंड फिया घेतल्या जातात, वगैरे वगैरे. ह्या संस्थांमधून काय सांगतात (म्हणजे “शिकवितात”) तर म्हणे सोशल मिडिया म्हणजे फेसबुक, ट्विटर वर कसं काम करा, व्हिडियो मार्केटिंग कसं करा, ते कसं मोजायचं (analytics) वगैरे वगैरे. असा एकच अभ्यासक्रम सगळ्यांना कसा काय लागू होईल? एखाद्या मोठ्या कंपनी करिता बनविलेली व्युहरचना छोट्याशा हॉटेल व्यावसायिकाला कशी लागू

होईल? “तत्वं तीच असतात” असं जरी म्हटलं तर मग, मुळात सगळ्या “मार्केटिंग” ची तत्व सारखीच असतात की ! डिजिटल मार्केटिंग म्हणजे एखाद्या व्यवसायाला online माध्यमातून लोकांपर्यंत पोचविणे असा जर अर्थ असेल, तर मार्केटिंग म्हणजे एखाद्या व्यवसायाला लोकांपर्यंत पोचविणे असा अर्थ होईल. आणि ह्यात हे एकच तत्त्व लागू पडतं.

## डिजिटल मार्केटिंग करा, शिक्षण आपोआप होईल

शिक्षणही अनौपचारिकपणे “होणारी” क्रिया आहे. त्यामुळे तुम्हाला “डिजिटल मार्केटिंग” शिकायचं असेल (अगदी नोकरी करण्याकरीताही), तर आधी ते वापरा. अगदी ‘प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग’ किंवा ‘प्रकल्पातून शिक्षण’ वगैरे गोंडस नाव द्या त्याला एखादं, पण ते कोणत्याही संस्थेत जाऊन शिकण्यापेक्षा तुमच्याच संस्थेत म्हणजे तुमच्यावरच प्रत्यक्ष वापरा. म्हणजे करायचं काय? तरकिमान असं ठरवून टाका, “online वरून मी माझं उर्वरित शिक्षण (formal वगैरे भानगडीत पडत असाल तर!) मी स्वत:च्या पैशाने करीन”, किंवा मुलेबाळे असणारे माझ्यासारखे वडीलधारे असाल, तर ठरवा (आणि इच्छा असेल तर!) की “मी ह्या वर्षात अमुक-अमुक पैसे online माध्यमातून फावल्या वेळात मिळवीन.” असा रूपांतरण होऊ शकणारा संकल्प (Convertible Goal हे त्याचं मऱ्हाटी नाव) हवा किंवा ध्येय हवे. ते ध्येय साध्य करताना चुकाल, पडाल, पुन्हा उभे राहाल वगैरे वगैरे. हे ‘होईल’ शिक्षण.

## हे पुरेसं असेल?

तुमच्यापुरता विचार केलात, तर हो. आपण ST stand वर गेल्यावर आपल्याला जाणारया गाड्यांची माहिती असली कि बस झालं की. बाकीच्याही सर्व गाड्यांची माहिती हवी, ST stand चं व्यवस्थापन कसं चालतं वगैरे शी तुम्हाला सध्या कर्तव्य नाही, कारण जायचं ठिकाण ठरलेलं आहे. आणि सध्या तेच ध्येय आहे. एक एक टप्पा तुम्हाला शिकवीत जाईल. म्हणजे काय तर पुन्हा हा असाच मार्ग निवडलात , तर साधारणपणे कोणत्या प्रकारच्या अनुभवांना सामोरं जावं लागेल ते आधीच ठाऊक असणे वत्यासाठी आगाऊ तयारी करीत राहणे हा नक्कीच शहाणपणा आहे परंतु एवढ सगळं करूनही एखादी विचित्र परिस्थिती समोर उभी राहू शकते हे भानही आवश्यक आहे.

## हाच अभ्यासक्रम असेल, तर?

एखाद्या संस्थेचा अभ्यासक्रम असेलही असा. फक्तअशा ठिकाणी ‘शिकायला’ जाताना अनेक ‘अनावश्यक’ गोष्टीही शिकविल्या जातील हे लक्षात ठेवा. सोयीचं वाटत असेल, तर काहीच हरकत नाही, फक्त डोक्यात तुमचा स्वत:चा ‘प्रोजेक्ट’ तयार ठेवा, म्हणजे शिकलेल्या (म्हणजेच माहित झालेल्या) गोष्टी, तंत्रे वापरून पाहता येतील. एखादं तंत्र वापरून पाहताना जो बरा वाईट अनुभव येईल, ते होणारं शिक्षण. ही तुमची शिदोरी.

## बदल नक्की कुठे अपेक्षित आहे ?

जी जी राष्ट्र प्रचंड समृद्ध झाली, ती ती राष्ट्र नोकऱ्या “देतात” व सेवा ‘घेतात’. आपला देश उलटं करतो बरोब्बर. त्या त्या राष्ट्रांची उदाहरणं, किंवा आपल्या माहितीतल्या यशस्वी व्यक्तींची उदाहरणं डोळ्यासमोर ठेवली की लगेच लक्षात येईल, आपण अधिकाधिक नोकऱ्या ‘देणारे’ निर्माण करायला हवेत. ह्याकरिता शिक्षण, अभ्यासक्रम येतीलच. प्रत्येकच व्यक्ती अगदी स्वयंभू ‘उद्योजक’ असेल असं नाही, पण ‘व्यावसायिक’ किंवा ‘धन्देवाला’ तरी करता येईल. तेव्हाच देश आणि पर्यायाने जनता “समृद्ध” होईल. टप्प्या-टप्प्यानेच होईल हे कार्य.

## अभ्यासक्रम

हे अभ्यासक्रम तयार करणारेच मुळात बदलायला हवेत. आपल्याकडे उच्चशिक्षित व प्रशासकीय नोकऱ्या करणाऱ्या मंडळींचं इतकं कौतुक का आहे? मला वाटतं, की खालील बदल जर केले, तर आपली पुढची पिढी तरी नक्कीच समृद्ध होईल :-

१. पाठ्य पुस्तकांमध्ये उदाहरणं द्यायची ती स्थानिक, हिरोज ची. ज्यांनी प्रस्थापित शिक्षणाशिवाय यश मिळवलंय. (उदा. नागराज मंजुळे, ललिता बाबर इ.)
२. अभ्यासक्रम अगदी विभागानुसार (छोट्यात छोटा विभाग असावा) तयार करावा.
३. अभ्यासक्रम करतानाच ह्यामंडळींची मदत घ्यावी. म्हणजे एखादं “कामच” करायला घ्यायचं आणि सपोर्ट ला म्हणजे सावरायला ही मंडळी असतील.
४. अपयश म्हणजे failure लाही यशा इतकंच महत्त्व द्यावं.
५. प्रत्येक काम करताना, नंतर आलेल्या अनुभवांची “विचार प्रक्रिया” सांगायला प्रेरित करावं.
६. वरील कामांचे “Documentation” न करता लक्षात ठेवण्यावर (तसेच तेही आवश्यक तेवढेच) भर द्यावा.
७. प्रत्येक अनुभव स्वत:च घ्यायला हवा असं अजिबात नाही. सहकाऱ्यांच्याही अनुभवातून आपण शिकू शकतो. मोठा शहाणपणा आहे तो, हे बिंबविले पाहिजे.
८. हे सगळं चालू असताना, आजूबाजूच्या जगातले भाव भावनांचे हल्ले कसे झेलायचे आणि आपण आपल्या प्रकल्पातच कसं प्रेरित राहायचं हे देखील बोलत राहायला हवं.

येत्या दिवाळीच्या पहाटे पहाटे “जास्तीत जास्त उद्योजक घडविण्याचा” संकल्प सोडून नवा वर्षाचं आपण स्वागत करूयात का?

- **सौमित्र घोटीकर,**

**Online Marketing** चे सल्लागार,

**Joy Web Services Pvt. Ltd.** पुणे चे संचालक

**या विषयाशी निगडीत असलेले अजून लेख वाचायचे असल्यास अथवा download करायचे असल्यास या link वर click करणे ===> http://joywebservices.com/shikshanvedh/**